महाराष्ट्र शासन (गृहनिर्माण विभाग)

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या अंतर्गत (भू-विनियोग) नियम १९८१ आणि (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम १९८१ त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणांच्या अधिन राहून महाराष्ट्र शासनाच्या नगररचना विभाग दि. ०८/११/२०१३ रोजीच्या अधिसूचना व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणानुसार छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या म्हाडा गृहनिर्माण योजना व २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजने अंतर्गत एकूण २०४ निवासी गाळे(बैठे घर)/सदनिका/भुखंडाच्या विक्रीसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

ऑनलाईन सोडत- ऑगस्ट २०२६

अर्जदाराची नोंदणी, ऑनलाईन अर्ज भरणे व स्विकृतीचे वेळापत्रक

सोडतीसाठी ऑनलाईन नोंदणीची सुरुवात - दिनांक २८/०८/२०२६ दुपारी १२.०० वाजता	सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या प्रारुप यादीची प्रसिध्दी - दि. ०५/१०/२०२६ दुपारी ०३.०० वाजता
सोडतीसाठी ऑनलाईन अर्जाची सुरुवात - दि.२८/०८/२०२६ दुपारी १२.०० वाजता	प्रारुप यादीनुसार ऑनलाईन आक्षेप दाखल करण्याची अंतिम तारीख व वेळ - दि.०५/१०/२०२६ दुपारी ३.०० ते दि. ०७/१०/२०२६ दुपारी ०५.०० वाजेपर्यंत
ऑनलाईन पेमेंट स्विकृती सुरूवात - दि. २८/०८/२०२६ दुपारी १२.०० वाजता	सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या अंतिम यादीची प्रसिध्दी - दि. १२/१०/२०२६ दुपारी १२.०० वाजता
सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ - दि. २८/०९/२०२६ रात्री ११.५९ वाजेपर्यंत	सोडत दिनांक व वेळ - अर्जदारांना स्वतंत्ररीत्या कळविण्यात येईल.
ऑनलाईन पेमेंट स्विकृती अंतिम तारीख - दि. २८/०९/२०२६ रात्री ११.५९ वाजेपर्यंत	सोडतीमधील यशस्वी व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे - सोडतीच्या दिवशी दुपारी ४.०० वाजता
बँकेत RTGS/NEFT द्वारे अनामत रक्कम भरण्याचा अंतिम - दि. २८/०९/२०२६ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत.	सोडतीचे स्थळ- अर्जदारांना स्वतंत्ररीत्या कळविण्यात येईल.

ऑनलाईन अर्ज भरावयाच्या कार्यपध्दतीकरीता,सविस्तर माहिती पुस्तिकेकरीता तसेच अर्ज करण्याकरिता अर्जदाराने ***https://housing.mhada.gov.in*** किंवा ***https://www.mhada.gov.in*** या संकेत स्थळ किंवा म्हाडा लॉटरी ॲप (App) MHADA Housing Lottery System(MHADA Housing Lottery) वरुन माहिती प्राप्त करुन घेवून अर्ज सादर करावा.

गटनिहाय उत्पन्न मर्यादा खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

अ.क्र.	उत्पन्न गट	सुधारीत कमाल उत्पन्न मर्यादा (रुपये वार्षीक)	
		कमाल उत्पन्न मर्यादा (छत्रपती संभाजीनगर शहर तसेच १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्राकरीता) संकेत क्र. २६७ ते २७३ व संकेत क्र.२७५ करीता	उर्वरित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र (संकेत क्र.२७४)
१	अत्यल्प उत्पन्न गट (EWS)	रुपये ६,००,०००/- पर्यंत	रुपये ४,५०,०००/- पर्यंत
२	अल्प उत्पन्न गट (LIG)	रुपये ९,००,०००/- पर्यंत	रुपये ७,५०,०००/- पर्यंत
३	मध्यम उत्पन्न गट (MIG)	रुपये १२,००,०००/- पर्यंत	
४	उच्च उत्पन्न गट (HIG)	कमाल मर्यादा नाही. (रु.१२,००,०००/- पेक्षा जास्त)	

सर्वसाधारण सूचना

१.अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.
२.अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.
३.मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ती मध्यम व उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.
४. उच्च उत्पन्न गटातील व्यक्ती केवळ उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.(या गटासाठी कमाल मर्यादा नाही.)

* प्रत्येक अर्जाकरिता माहिती पुस्तिकेत योजनानिहाय नमुद अनामत रक्कमेव्यतीरिक्त अर्जाची शुल्कापोटी किंमत रु. ६००/- + GST रु. १०८/- असे एकूण रु. ७०८/- भरावे लागतील. ऑनलाईन अर्ज शुल्क रक्कम विना परतावा असेल.

* अर्जदारास उत्पन्नाचा पुरावा सन ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या आर्थिक वर्षाच्या कालावधीतील सादर करावा लागेल. अर्जदाराचे आयकर विवरण पत्र अथवा तहसिलदार कार्यालयाचे उत्पन्न दाखला प्रमाणपत्र यातील एकुण उत्पन्न ग्राह्य धरले जाईल.

नोंदणीसाठी व अर्ज भरण्यासाठी पॅन कार्ड,आधार कार्ड,बँकेचा रद्द केलेला चेक अथवा पासबुकचे पहिले पान,मोबाईल क्रमांक (whatsapp सह) व ईमेल आयडी,वय व अधिवास प्रमाणपत्र(Domicile Certificate) २०१८ नंतरचे आवश्यक आहेत.सोडत प्रक्रियेमधील सर्व संपर्क ईमेल,एसएमएस व संकेत स्थळावर अपडेट करण्यात येईल.लेखी पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. जाहिरात व सोडतीच्या अनुषंगाने काही नवीन सूचना असल्यास म्हाडा लॉटरी संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.

हेल्प लाईन क्रमांक - (१) अर्ज नोंदणी करिता- ०२२ ६९४६८१०० (२) ऑनलाईन पेमेंट करिता- १८००८९१८२९७, ७०३०९००२६५, support@easebuzz.in व तसेच अधिक माहितीसाठी संपर्क :- छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, सि.बी.एस.रोड, महावीर स्तंभजवळ, छ.संभाजी नगर-४३१००१. दु.क्र.०२४०-२३३४०३५.

टिप- सोडतीत समावेश असलेल्या योजनाची सविस्तर माहिती,पात्रता निकष,आरक्षण,अर्ज करण्याची कार्यपध्दती,अटी व शर्ती इत्यादी बाबी नमुद असलेली छत्रपती संभाजीनगर मंडळ सोडत ऑगस्ट-२०२६ ची माहिती पुस्तिका म्हाडाच्या सोडतीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे तसेच खालील दिलेल्या क्यु-आर कोड वर उपलब्ध आहे याची नोंद घ्यावी. सदर सोडतीकरीता अर्ज करण्यापुर्वी अर्जदाराने संकेत स्थळावरील व माहिती पुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचूनच तसेच स्थळनिहाय माहिती घेवून अर्ज करावा. * सदनिकेच्या संख्येत बदल संभवनीय असून किंवा इतर कोणत्याही कारणासाठी मा. मुख्य अधिकारी/ छ.संभाजीनगर मंडळ यांनी घेतलेला निर्णय सर्वांना बंधनकारक राहील. तसेच जाहिरातीत किंवा माहितीपुस्तिकेतील कोणत्याही बदल बाबत व छपाईच्या चुकीबाबतचे मा.मुख्य अधिकारी/छ.संभाजीनगर मंडळ यांनी आपले अधिकार राखीव ठेवलेले आहेत.अर्जदारास याचा गैरफायदा घेता येणार नाही.

माहिती पुस्तिकेसाठी बाजुचा QR Code स्कॅन करावा.

स्वाक्षरित
वैभव केदारे
मुख्य अधिकारी
छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ